**प्रेस नोट** **दिनांक ०७/०८/२०१९**

## फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे

## बेकायदेशिर गुटखा विक्री करणा-या व्यापा-यास फरासखाना पोलीसांकडुन अटक

फरासखाना पोलीस स्टेशनचे तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी फरासखाना पोलीस स्टेशनचे हद्दित पेंट्रालिंग करीत असताना स्टाफमधील पो.शि. पंकज देशमुख यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, पंचशील तरुण मंडळाचे पाठीमागे २१६ मंगळवार पेठ पुणे येथील किराणा मालाचे दुकानात एक इसम बेकायदेशीरपणे गुटखा विक्री करीत आहे. त्यानुसार मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर नावंदे यांचे आदेशाने भैरव सुपर मार्केट २१६/२०१७ मंगळवार पेठ पुणे या दुकानात जावुन पाहणी करुन दुकानाचे मालक नामे दिनेश वेनाराम भाटी वय ३४ वर्षे व्यवसाय व्यापार रा.२१६ मंगळवार पेठ पुणे यांचेकडे चौकशी करुन त्यांनी त्यांचे राहते घरात ठेवलेला किंमत रुपये १३०६३ रुपयाची विमल व गोवा गुटख्याचा विक्रीसाठी ठेवलेला माल व नमुद दुकान मालक यास ताब्यात घेवुन त्याचेवर अन्न व औषध प्रशासन विभाग औध पुणे यांचे मार्फत कारवाई करण्यात आली असुन त्याचेविरुध्द श्रीमती शितल गजानन घाटोळे अन्न सुरक्षा अधिकारी,अन्न व औषध प्रशासन विभाग औध पुणे यांनी कायदेशीर फिर्याद दिल्याने गुन्हा नोंद करुन त्यास त्यात अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे, श्री.श्रीकांत तरवडे सो॰, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पुणे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्री,प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.किशोर नावंदे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन पुणे, श्री.नंदकिशोर शेळके पोलीस निरीक्षक (गुन्हे) फरासखाना पोलीस स्टेशन पुणे तसेच तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रतीक्षा शेंडगे, यशपाल सुर्यवंशी, पोहवा बापुसाहेब खुटवड, पोलीस नाईक अमर शिंदे, दिनेश भांदुर्गे, अमोल सरडे, मोहन दळवी, अमेय रसाळ, मयुर भोकरे, पंकज देशमुख, राजु देवकर, अनिल गायकवाड यांनी केली आहे.